(TM)
महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
प्रकाशगड, ४था मजला, प्रा.अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व),मुंबई - ४०० ०५१ दूरध्वनी- २६४७४२११, २६४७२१३१
Website:www.mahadiscom.in, E-mail :www.msedclsalary@gmail.com

क्र. मासं /वेवदे /२२६४४

दिनांक :-१३.०८.२०१९

# परिपत्रक

विषय :- कोल्हापूर आणि सांगली जिल्हयात अतिवृष्टीमुळे उद्‌भवलेल्या नैसर्गिक आपत्तीग्रस्त नागरिकांना मदत म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतील सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या माहे ऑगस्ट-२०१९ च्या वेतनातील एक दिवसाचे वेतन उपलब्ध करुन देण्याबाबत.

*****************

कोल्हापूर आणि सांगली जिल्हयात अतिवृष्टीमुळे उद्‌भवलेल्या नैसर्गिक आपत्तीग्रस्त नागरिकांना मदत म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कपंनी मर्यादित मधील सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या माहे ऑगस्ट-२०१९ च्या वेतनातील एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये देणगी म्हणून उपलब्ध करुन देणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

२. ज्या अधिकारी/कर्मचाऱ्याची मासिक वेतनातून रक्कम वसूल करण्यास हरकत असेल त्यांनी त्या आशयाचे वैयक्तिक पत्र संबंधित कार्यालयाच्या मानव संसाधन विभाग/आहरण व संवितरण अधिकारी यांच्याकडे दि.२०.०८.२०१९ पर्यंत सादर करावे. अशा अधिकारी/कर्मचारी यांचे वेतनातून एक दिवसाचे वेतन कपात करण्यात येवू नये. सदर एक दिवसाचे वेतन कपात करतांना ते मूळ वेतन+ महागाई भत्ता यांच्या एकूण रकमेच्या आधारे गणना करुन कपात करण्यात यावे. तसेच, एक दिवसाच्या एकूण वेतनाइतक्या रकमेपेक्षा कमी रक्कम कापून घेण्यास परवानगी देण्यात येवू नये.

३. सदरची रक्कम वेतनातून कपात करतांना ती ३१० या पे कोड (GL १०९०२३१५ Natural Calamities Donation) अंतर्गत कपात करण्यात यावी. अशाप्रकारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीची एकत्रित रक्कम सांघिक कार्यालयाद्वारे धनादेशाने **"मुख्यमंत्री सहायता निधी"** मध्ये जमा करण्यात येईल.

४. सदर प्रशासकिय परिपत्रक कंपनीच्या Employee Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**शिवाजी इंदलकर**
**कमांडर(निवृत्त)**
**मुख्य महाव्यवस्थापक(मासं)(प्र)**